**प्रति,**
**1. मा. गृहमंत्री,**
महाराष्ट्र सरकार.

**2. मा. मुख्यमंत्री,**
महाराष्ट्र सरकार.

**विषय : श्रद्धा वालकर या हिंदु युवतीचे 35 तुकडे करून निर्घृण हत्या करणाऱ्या आफताबला तात्काळ फासावर लटकवावे, तसेच अशा घटना रोखण्यासाठी कठोर असा 'लव्ह जिहादविरोधी कायदा' करावा, यांबाबत....**

महोदय,

पालघर येथील आफताब पुनावाला हा नराधमाने श्रद्धा वालकर या हिंदु तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यासोबत 'लिव इन'मध्ये रहात होता. श्रद्धाने लग्न करण्याविषयी त्याच्याकडे आग्रह धरल्यावर आफताबने तिचे 35 तुकडे करत निघृणपणे हत्या केली. ही घटना अतिशय सुन्न करणारी आणि देशभरातील युवतींमध्ये दहशत निर्माण करणारी आहे. या घटनेतून लव्ह-जिहादी आफताबची वासनांधता, क्रूरता आणि विकृत मानसिकता दिसून येते. या घटनेमुळे देशभरात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. ही केवळ पहिली घटना नसून काही दिवसापूर्वी मुंबईतील टिळकनगर येथे रहाणारी रुपाली चंदनशिवे या युवतीने बुरखा घालण्यास नकार दिला, म्हणून तिचा पती इक्बाल मोहम्मद शेख याने तिची गळा चिरून हत्या केली होती. अशाच लव्ह जिहादच्या घटना कोल्हापूर, मालेगाव आणि अमरावतीसह राज्यभरात उघडकीस आल्या आहेत. एकूणच राज्यात दिवसेंदिवस 'लव्ह जिहाद'ची समस्या गंभीर रूप धारण करत आहे. खोटे नाव आणि खोटी ओळख सांगणे, फसवणे, महागडी गिफ्ट देणे, रहाणीमान चांगले दाखवणे आदी अनेक माध्यमांतून हिंदु युवतींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून धर्मांतर करण्यात येते, त्यानंतर त्यांच्याशी 'निकाह' केला जातो. यामध्ये हिंदु युवतींचे भयंकर शोषण केले जाते. तरी या अत्यंत गंभीर समस्येवर उपाय म्हणून महाराष्ट्रात तात्काळ 'लव्ह जिहाद विरोधी कायदा', तसेच 'धर्मांतर विरोधी कायदा' लागू करावा, अशी आमची मागणी आहे.

**⁕ या निमित्ताने आम्ही पुढील सूत्रांकडे आपले लक्ष वेधू इच्छितो...**

1. अमरावती येथील धारणी येथे रूग्णवाहिकेचा चालक असणाऱ्या धर्मांधाने येथील उच्च विद्याविभुषित हिंदु तरूणीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिला 3 दिवस घरात डांबून ठेवल्याची घटना घडली. या तरूणीची प्रकृती खालावल्याने तिला जिल्हा सामान्य रूग्णालयात भरती करण्यात आले. हा विवाह अनधिकृत पद्धतीने करण्यात आला होता. अशाच प्रकारच्या 8 घटना अमरावती जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत उघडकीस आल्या आहेत.

2. दिनांक 2 नोव्हेंबर 2022 यादिवशी कोल्हापुरातून अल्ताफ काझी या मुसलमान युवकाने एका अल्पवयीन हिंदू मुलीला पळवून नेले. 17 दिवस मुलगी बेपत्ता होती; मात्र पोलीस कारवाई करण्यास टाळाटाळ करत होते. हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी आंदोलन केल्यावर कर्नाटकातील संकेश्वर येथून अल्ताफला ताब्यात घेण्यात आले.

3. दिनांक 10 नोव्हेंबर 2022 यादिवशी मालेगाव येथील कॅम्प परिसरातून एका आदिवासी मुलीचे मुसलमान मुलाने अपहरण केल्यामुळे आदिवासी संघटनांनी ही 'लव्ह जिहाद'ची घटना असल्याचे सांगत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

4. मे 2022 मध्ये मुंबईतील गोरेगाव येथील मोहम्मद अन्सारी याने 18 वर्षीय सोनम शुक्ला या हिंदु युवतीची हत्या केली होती. तिचा मृतदेह मालाडच्या खाडीत फेकून दिला. नंतर मोहम्मद अन्सारीला अटक करण्यात आली.

5. 23 ऑगस्ट 2022 यादिवशी झारखंडमधील दुमका येथे बारावीत शिकणाऱ्या अंकिता सिंह या अल्पवयीन युवतीने मैत्री करण्यासाठी नकार दिल्याने शाहरूख हुसेन आणि छोटू खान यांनी तिच्यावर पेट्रोल टाकून तिला जाळून मारले.

6. वर्ष 2019 मध्ये नागपूर येथे मॉडेलींग करणारी खुशी परिहार या हिंदू युवतीची अश्रफ शेख या नराधमाने क्रूरपणे हत्या केली होती. नंतर अश्रफ शेखला अटक करण्यात आली.

7. ऑक्टोबर 2000 मध्ये हरियाणा राज्यात 'निकिता तोमर' या हिंदू मुलीला 'तौसिफ' नावाच्या मुसलमान युवकाने गोळ्या झाडून ठार मारले होते. मृत निकिताचे वडील श्री. मूलचंद तोमर यांनी या प्रकरणी सांगितले की, तौसिफ निकिताला इस्लाम स्वीकारण्यासाठी, तसेच लग्नासाठी सतत दबाव टाकत होता.

7. राष्ट्रीय नेमबाज 'तारा सहदेव' या हिंदु युवतीशी रकिबुल या धर्मांधाने हिंदु असल्याचे खोटे सांगून आणि फसवून तिच्याशी विवाह केला. लग्नानंतर खरे नाव सांगून तिच्यावर इस्लाममध्ये धर्मांतर करण्यासाठी जबरदस्ती केली. या प्रकरणाची राष्ट्रीय स्तरावर चर्चा झाल्याने 'लव्ह जिहाद'चे भयावह वास्तव देशासमोर आले होते.

8. केरळ उच्च न्यायालयाचे 'शाहन शाह विरूद्ध केरळ सरकार' या प्रकरणाचे निकालपत्र (6.11.2009) राज्यातील 'लव्ह जिहाद'ची भयावह स्थिती सुस्पष्ट करणारे आहे. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, शाहीन फ्रंट, कॅम्पस फ्रंट अशा अनेक जिहादी संघटनांचा त्यात उल्लेख आहे.

9. तसेच वर्ष 2006 ते 2009 पर्यंत 'लव्ह जिहाद'च्या माध्यमातून साधारणतः 3 ते 4 हजार युवतींना बाटवून त्यांचे बलपूर्वक इस्लाममध्ये धर्मांतर करण्यात आले. यासाठी आखाती देशांतून पैसा पुरवण्यात येतो, याचाही त्यात उल्लेख आहे. तसेच हे केवळ केरळ राज्यापुरते मर्यादित नसून उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्र अशा विविध राज्यांतही याचे जाळे पसरले आहे.

10. केरळ राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री ओमान चंडी यांनी विधीमंडळात सांगितले होते की, वर्ष 2006 मध्ये 2,667 युवतींचे इस्लाममध्ये धर्मांतर करण्यात आले. तसेच वर्ष 2009 ते 2012 या कालावधीत 2,195 हिंदू तरुणींचे इस्लाममध्ये धर्मांतर करण्यात आले आहे.

11. माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्रात गृह विभागाने 'लव्ह जिहाद'च्या तक्रारींची नोंद केली असून त्यात वर्ष 2008 ते 2011 या 4 वर्षांत 22 तक्रारी नोंद झालेल्या आहेत. समाजात अब्रूनुकसानी होऊ नये, म्हणून अशी प्रकरणे उघड होण्याचे प्रमाण अत्यल्प असते. त्यातही उघड झाल्यास त्याविषयी पोलीस तक्रारी होणे, याचे प्रमाण अत्यल्प असते. जरी पोलीस तक्रार झाली, तरी पोलिसांनी त्या 'लव्ह जिहाद' म्हणून नोंद करून घेणे, याचे प्रमाण तर नगण्य आहे. असे असतांना 22 तक्रारी नोंद झाल्या असतील, तर प्रत्यक्षात किती प्रकरणे घडली असतील, याचे अनुमान लावता येईल.

12. नुकतेच पुणे जिल्ह्यातून 840 महिला-मुली बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अशा अनेक जिल्ह्यातून मुली बेपत्ता झालेल्या आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या आकडेवारीनुसार गेल्या वर्षी देशातील महिलांवरील एकूण गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र पहिल्या तीन क्रमांकावर आहे. महिलांचे अपहरण आणि महिलांना आत्महत्येसाठी प्रवृत्त करणे, महिलांची शालीनता भंग करण्याच्या हेतूने त्यांच्यावर हल्ला करणे आणि महिलांच्या विनयशीलतेचा अपमान यासारख्या प्रकरणांमध्ये महाराष्ट्रात 39,526 गुन्हे नोंदवले गेले आहेत.

**13. महाराष्ट्र शासनाने महिलांवर अत्याचार रोखण्यासाठी नेमलेल्या निवृत्त न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी समितीने वर्ष 2014 मध्ये गृह विभागाला अहवाल दिला होता. या अहवालात प्रेमाच्या जाळ्यात ओढून मुलींचे धर्मांतर करण्याचे प्रमाण वाढले आहे. असे धर्मांतर रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ओडिसा आणि मध्यप्रदेश राज्यांच्या धर्तीवर 'धर्मांतर बंदीचा कायदा' करण्याची महत्त्वपूर्ण शिफारस गृह खात्याला केली होती.**

14. शिकवणीवर्ग, शाळा-महाविद्यालये, मोबाईल रिचार्ज करण्याची ठिकाणे, कॉल सेंटर, ब्युटी पार्लर वा स्पा सेंटर्स आदी अनेक ठिकाणी मुसलमान युवक सापळा लावून असे प्रकार सर्रास करत असल्याचे आढळून येते.

15. अनेकदा मदरसे अथवा मशिदी यांच्या माध्यमातून मुसलमान युवकांना 'लव्ह जिहाद'साठी प्रोत्साहन दिले जाते, असे उघड झाले आहे. यासाठी मुसलमान युवकांना मुसलमानेतर युवतींना जाळ्यात अडवण्यासाठी महागडे दुचाकी वाहन, महागडे मोबाईल, चांगले कपडे आदींसह मुलींवर खर्चासाठी पैसेही पुरवले जातात. इतकेच काय मुसलमान युवकांना प्रलोभन म्हणून कोणत्या जातीच्या/धर्माच्या युवतीशी विवाह केल्यास किती लाख रुपये मिळतील, असे दरपत्रकच नुकतीच बंदी घालण्यात आलेल्या पीएफआय संघटनेने जाहीर केले होते.

**एकूणच हिंदु मुलींना फसवून प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे धर्मपरिवर्तन करणे, त्यांच्याशी ‘निकाह’ करणे, याला नकार दिल्यास बलात्कार करणे, ब्लॅकमेल करणे, हत्या करणे आदी गंभीर प्रकारांची असंख्य प्रकरणे यापूर्वी उघड झाली आहेत. या घटना आता नित्याच्याच झाल्या आहेत. आपल्या मुली–बाळींना पळवण्यासाठी हे नराधम हिंदूंच्या घरापर्यंत पोहोचले आहेत. अशा घटना रोखण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यायला हवा. हा राज्याच्या भावी पिढीचा प्रश्न आहे. पुन्हा एखाद्या युवतीचे 35 तुकडे आपण होऊ देणार आहात का ? हा प्रश्न आपल्यासमोर आहे.**

*** या संदर्भात आम्ही मागणी करत आहोत की....**

1. श्रद्धा वालकरची 35 तुकडे करून हत्या करणाऱ्या लव्ह जिहादी नराधम आफताबला तत्काळ फासावर लटकवावे.
2. या हत्येचा तपास करतांना हत्या करण्याचा उद्देश जाणून घेतला पाहिजे. नराधम आफताबने आणखीन काही मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढल्याची माहिती आहे. त्या प्रकरणांचीही चौकशी महाराष्ट्र शासनाने करावी.
3. राज्यातून महिला आणि मुली बेपत्ता होण्यामागे काही षड्यंत्र नाही ना, या मागे ‘लव्ह जिहाद’चा प्रकार तर नाही ना, याचीही चौकशी करण्यासाठी गृहखात्याने स्वतंत्र पथक नेमावे.
4. राज्यात लवकरात लवकर ‘लव्ह जिहाद विरोधी कायदा’ आणि ‘धर्मांतरबंदी कायदा’ लागू करावा.
5. ‘लव्ह जिहाद’ची प्रकरणे हाताळण्यासाठी वा त्यांचा शोध घेण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर पोलिसांची विशेष शाखा स्थापन करावी. अशा प्रकरणांमध्ये ‘लव्ह जिहाद’च्या नावाखाली गुन्हे नोंद करावेत.
6. ‘लव्ह जिहाद’साठी विदेशातून होणारा अर्थपुरवठा, युवतींची तस्करी आणि त्यांचा आतंकवादी कारवायांसाठी होणारा वापर यांचीही शासनाने चौकशी करावी आणि त्यात सापडलेल्या दोषींवर कठोर कारवाई करावी.
7. लव्ह जिहाद प्रकरणांत मदरसे आणि मशिदी यांचा संबंध आढळून आल्यास त्यांवर तत्काळ बंदी घालण्यात यावी.

कळावे, ही विनंती !

आपला नम्र,